**वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, अंतर्गत वस्त्रोद्योग विभाग (खुद्द) मधील वित्तीय प्राधिकाराच्या प्रयोजनार्थ “प्रशासकीय विभाग प्रमुख” “विभाग प्रमुख”, “प्रादेशिक विभाग प्रमुख” व “कार्यालय प्रमुख” म्हणून घोषित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः सपववि-३७०१२/३८/२०२६-DESKTEX-२**
१४ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०००३२
तारीख: २० ऑगस्ट, २०२६

**वाचा :-**

१. **शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांकः विअप्र-१०९८/प्र.क्र. ५३/२०१६/विनियम, दि. ६.१०.१९९९**
२. **शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांकः विअप्र-२०१६/प्र.क्र. ५३/२०१६/विनियम, दि. २१.१.२०१७**
३. **शासन शुध्दीपत्रक, वित्त विभाग क्रमांकः विअप्र-२०१६/प्र.क्र. ५३/२०१६/विनियम, दि. ३.२.२०१७**

**प्रस्तावना :-**

मुंबई वित्तीय नियम १९५९ च्या नियम-२ (१०) नुसार वित्तीय प्राधिकार व इतर वित्तीय नियमांच्या प्रयोजनार्थ मुंबई नागरी सेवा नियम १९५९ च्या नियम-९ (२३) नुसार परिशिष्ट-२ मध्ये सर्व मंत्रालयीन विभागांसाठी शासनाचे सचिव हे विभाग प्रमुख म्हणून घोषित करण्यात आले आहेत. त्यानंतर शासन वेळोवेळी याच नियमाच्या नियम-२ (१०) व (१०-अ) तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग- पहिला, उपविभाग-एक, अनुक्रमांक-१,२,३ नुसार विभागप्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख, कार्यालय प्रमुख म्हणून घोषित करु शकतील अशी तरतूद आहे. उपरोक्तप्रमाणे वस्त्रोद्योग विभाग व या विभागाच्या अधिनस्त असलेल्या क्षेत्रिय कार्यालयाच्या वित्तीय प्राधिकाराच्या प्रयोजनार्थ "प्रशासकीय विभाग प्रमुख" “विभाग प्रमुख”, “प्रादेशिक विभाग प्रमुख”, व “कार्यालय प्रमुख” म्हणून घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

वस्त्रोद्योग विभाग व या विभागाच्या अधिनस्त असलेल्या क्षेत्रिय कार्यालयाच्या वित्तीय प्राधिकाराच्या प्रयोजनार्थ खालील अधिकाऱ्यांना "प्रशासकीय विभाग प्रमुख", “विभाग प्रमुख”, “प्रादेशिक विभाग प्रमुख” व “कार्यालय प्रमुख” म्हणून घोषित करण्यास खालील अटींवर या शासन निर्णयाद्वारे मंजुरी देण्यात येत आहे.

अ) **वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर**

| **अ.क्र.** | **प्रशासकीय विभाग प्रमुख/ विभाग प्रमुख/ प्रादेशिक विभाग प्रमुख** | **पदनाम** |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय विभाग प्रमुख | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (वस्त्रोद्योग) |
| २. | विभाग प्रमुख | आयुक्त, वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर |
| ३. | प्रादेशिक विभाग प्रमुख | १) प्रादेशिक उप आयुक्त (वस्त्रोद्योग), मुंबई, |
| | | २) प्रादेशिक उप आयुक्त (वस्त्रोद्योग), नागपूर, |

| | | |
|---|---|---|
| | | ३) प्रादेशिक उप आयुक्त (वस्त्रोद्योग), छ. संभाजीनगर |
| | | ४) प्रादेशिक उप आयुक्त (वस्त्रोद्योग), सोलापूर |

ब) **रेशीम संचालनालय, नागपूर**

| अ.क्र. | प्रशासकीय विभाग प्रमुख/ विभाग प्रमुख/ प्रादेशिक विभाग प्रमुख | पदनाम |
|---|---|---|
| १ | प्रशासकीय विभाग प्रमुख | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (वस्त्रोद्योग) |
| २. | विभाग प्रमुख | संचालक, रेशीम संचालनालय, नागपूर |
| ३. | प्रादेशिक विभाग प्रमुख | १) उप संचालक, प्रादेशिक रेशीम कार्यालय, छ. संभाजीनगर |
| | | २) सहायक संचालक, प्रादेशिक रेशीम कार्यालय, पुणे |
| | | ३) सहायक संचालक, प्रादेशिक रेशीम कार्यालय, अमरावती |
| | | ४) सहायक संचालक, प्रादेशिक रेशीम कार्यालय, नागपूर |
| ४. | कार्यालय प्रमुख | १) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-१, जिल्हा रेशीम कार्यालय, नागपूर |
| | | २) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-१, जिल्हा रेशीम कार्यालय, आरमोरी, जि. गडचिरोली |
| | | ३) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-१, जिल्हा रेशीम कार्यालय, पाथरी, जि. चंद्रपूर |
| | | ४) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-१, जिल्हा रेशीम कार्यालय, अमरावती |
| | | ५) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-१, जिल्हा रेशीम कार्यालय, छ. संभाजीनगर |
| | | ६) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-१, जिल्हा रेशीम कार्यालय, बीड |
| | | ७) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-१, जिल्हा रेशीम कार्यालय, धाराशिव |
| | | ८) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-१, जिल्हा रेशीम कार्यालय, पुणे |
| | | ९) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-१, जिल्हा रेशीम कार्यालय, वाई, जि. सातारा |
| | | १०) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-१, जिल्हा रेशीम कार्यालय, सांगली |
| | | ११) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-१, जिल्हा रेशीम कार्यालय, सोलापूर |
| | | १२) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-१, जिल्हा रेशीम कार्यालय, अहिल्यानगर |
| | | १३) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-२, जिल्हा रेशीम कार्यालय, वर्धा |
| | | १४) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-२, जिल्हा रेशीम कार्यालय, भंडारा |

| | | |
|---|---|---|
| | | १५) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-२, जिल्हा रेशीम कार्यालय, गोंदिया |
| | | १६) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-२, जिल्हा रेशीम कार्यालय, यवतमाळ |
| | | १७) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-२, जिल्हा रेशीम कार्यालय, अकोला |
| | | १८) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-२, जिल्हा रेशीम कार्यालय, बुलढाणा |
| | | १९) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-२, जिल्हा रेशीम कार्यालय, वाशिम |
| | | २०) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-२, जिल्हा रेशीम कार्यालय, जालना |
| | | २१) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-२, जिल्हा रेशीम कार्यालय, लातूर |
| | | २२) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-२, जिल्हा रेशीम कार्यालय, नांदेड |
| | | २३) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-२, जिल्हा रेशीम कार्यालय, परभणी |
| | | २४) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-२, जिल्हा रेशीम कार्यालय, हिंगोली |
| | | २५) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-२, जिल्हा रेशीम कार्यालय, कोल्हापूर |
| | | २६) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-२, अंडीपुंज निर्मीती केंद्र, गडहिंगलज, जि. कोल्हापूर |
| | | २७) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-२, जिल्हा रेशीम कार्यालय, नाशिक |
| | | २८) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-२, जिल्हा रेशीम कार्यालय, जळगांव |
| | | २९) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-२, जिल्हा रेशीम कार्यालय, जव्हार, जि. पालघर |

१) उक्त अधिकाऱ्याला त्यांच्या कार्यालयीन कामकाजाच्या संदर्भात "प्रशासकीय विभाग प्रमुख" या नात्याने आवश्यकतेनुसार लोकलेखा समिती, तद्वतच विधानमंडळांच्या अन्य समित्या, न्यायालये, संविधानिक किंवा वैधानिक आयोग, प्राधिकरणे इत्यादींपुढे साक्ष द्यावी लागेल व तद्नुषंगाने संबंधित प्रकरणे हाताळावी लागतील.

२) वित्तीय बाबींच्या संदर्भात त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या सर्व विषयांसाठी आणि बाबींसाठी ते संपूर्णपणे जबाबदार राहतील.

३) विभागातील वित्तीय अनियमितता व तत्सम बाब घडल्यास त्या अनुषंगाने येणारी जबाबदारी व करावयाची कार्यवाही याबाबतची जबाबदारी प्रशासकीय विभागाचे प्रमुख या नात्याने त्यांच्याकडे असेल.

४) उक्त प्रशासकीय विभाग प्रमुखांना वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-१ ते ५ मधील वित्तीय शक्तीचे विहित मर्यादेच्या, अटी व शर्तींच्या अधीन राहून, मुंबई वित्तीय नियम १९५९, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५, महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियमपुस्तिका, खर्चाच्या संकीर्ण बाबी तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली यामधील तरतुदींनुसार अधिकार राहतील.

२. सदरहू शासन निर्णय प्रशासनिक विभागाला असलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८२०१४४३१२३०३६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by NISHA MANOHAR MAHAJAN
Date: 2026.08.21 11:01:18 +05'30'

**(निशा महाजन)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल **यांचे सचिव**, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय , मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (राज्य उत्पादन शुल्क , क्रिडा व युवक कल्याण अल्पसंख्याक) महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई..
५) मा. मंत्री (वस्त्रोद्योग) याचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुबई.
६) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा याचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
७) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
८) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, यांचे स्वीय सहायक, (सर्व प्रशासकीय विभाग) मंत्रालय, मुंबई.
१०) सचिव (वस्त्रोद्योग) यांचे स्वीय सहायक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर.
१२) संचालक (रेशीम), रेशीम संचालनालय, नागपूर.
१३) उप सचिव (वस्त्रोद्योग)/ उप सचिव (रेशीम/वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १ व २, मुंबई/नागपूर.
१५) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र- १ व २, मुंबई / नागपूर.
१६) महालेखापाल (वाणिज्यिक लेखापरीक्षा), मुंबई / नागपूर.
१७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१८) निवासी लेखा परीक्षक, मुंबई.
१९) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
२०) सहसंचालक, लेखा व कोषागारे (संगणक कक्ष), नवीन प्रशासन भवन, मुंबई.
२१) निवड नस्ती (टेक्स-२)